महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## बारामती परिमंडळ, बारामती.

CIN: U40109MH2005SGC153645
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दाखल तारीख :–०९/१०/२०१८
आदेश तारीख :–२१/१२/२०१८

**आदेश**

केस क्र. २०/२०१८

| | |
|---|---|
| १) मे. महालक्ष्मी आटोमोबाईल प्रा.लि.,<br>कसबा, बारामती ता. बारामती<br>जि.पुणे. | तक्रार अर्जदार (ग्राहक) |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता तथा नोडल अधिकारी.,<br>म.रा.वि.वि.कं.मर्या,<br>बारामती मंडल कार्यालय, बारामती. | विरुध्द पक्षकार (महावितरण) |

कोरम:– १) श्री. बी. डी. गायकवाड, अध्यक्ष,
२) श्री. एस. के. जाधव, ग्राहक सदस्य,
३) श्री. एम. ए. लवटे, सदस्य सचिव,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६, मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

१) मे. महालक्ष्मी आटोमोटीव्ह प्रा.लि, बारामती, यांचा ग्राहक क्र. १८६८४१३०६४०२ आहे. महावितरण कंपनीने जुलै २०१५ ते मार्च २०१८ या काळातील व्यापारी दराने केलेली वर्गवारी पूर्णपणे रदद करणेत यावी

व कायदेशीर असलेली औद्योगिक ही वर्गवारी निश्चित व कायम करणेत यावी. अशी तक्रार दाखल केली आहे.

## गाऱ्हाण्याचे स्वरुप

## तक्रार अर्जदार (ग्राहक) यांचा तोंडी युक्तीवाद

२) तक्रारदार यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री.जावेद बाबालाल मोमीन यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन तोंडी युक्तीवाद केला. सदर ग्राहकाने दि. २७/०७/२००४ रोजी १९ हॉ.पॉ. वीज कनेक्शन औद्योगिक म्हणून मंजूर करुन घेतले. आहे. त्यावेळी त्यांनी जिल्हा उद्योग केंद्रांची आवश्यंक तेवढी सर्व कागदपत्रे दाखले केली होती. व आद्यौगिक वर्गवारीत वीज कनेक्शन मंजूर करण्यात आले होते. तेंव्हा पासून मार्च २०१८ अखेर वीज बिला संदर्भात कोणतीही तक्रार व हरकत नव्हती. त्याच प्रमाणे कोणतीही थकबाकी नाही व सर्व बिले भरलेली आहेत. ग्राहकाच्या युनिटला वीज वितरण कंपनीच्या भरारी पथकाने दि. २८/०८/२०१७ रोजी भेट दिली होती. भरारी पथकास वीज बिल चुकीच्या वर्गवारीने होत आहे असे दिसून आले. ग्राहकाचे बिल औद्योगिक वर्गवारीने होत आहे ते व्यापारी दराने होणे आवश्यक आहे. असे ग्राहकास कळविले. भरारी पथकाने भेट दिली तेंव्हा त्यांनी कोणताही पंचनामा केलेला नाही, तपशीलवार अहवाल दिला नाही व ग्राहकाच्य सहया घेतलेल्या नाहीत. मार्च २०१८ मध्ये अतिरिक्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या, बारामती उपविभागीय कार्यालयाचे अधिकारी श्री. प्रकाश देवकाते यांनी जुलै २०१५ ते मार्च २०१८ या काळातील जवळ–जवळ ३३ महिन्यांचे बिल औद्योगिग वर्गवारी व व्यापारी वर्गवारी या दरातील फरकाचे बिल रुपये ०५,१७,५५०/– दिले आहे. सदरचे बिल पुर्णपणे चुकीचे व बेकायदेशीर आहे ते ग्राहकास मान्य नाही. व्यापारी वर्गीकरण झाल्याबदल कंपनीने कोणत्याही पत्राने कळविले नाही. अगर तशी नोटीस वर्तमान पत्रात दिली नाही.

ग्राहक प्रतिनिधीने पुढे असे कथन केले की, ॲपेलंट ट्रॅब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी दिल्ली अपील क्र १३१/२०१३ या केसमध्ये ७/०८/२०१४ रोजी दिलेला निकाल या प्रकरणास तंतोतंत लागू होत आहे. कंपनीने दिलेले सप्लीमेंटरी बिल चुकीचे व बेकायदेशीर आहे. पुर्वलक्षी प्रभावाने कोणतीही वसूली करता येणार नाही. ग्राहक प्रतिनिधीने त्यांच्या युक्तीवादात मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग केस क्र. २४/२००१ मधील दि. ११/२/२००३ रोजीच्या आदेशाचा आधार घेतला आहे. ग्राहकाने व्यापारी दराने दिलेले फरकाचे बिल रदद करावे व औद्योगिक वर्गवारी कायम करावी अशी मागणी केली आहे. भरारी पथकाने भेट दिलेल्या तारखेपासून ग्राहक व्यापारी दराने वीज बिल भरण्यास तयार आहेत. मानसिक व आर्थिक त्रास झाल्यामुळे रुपये २५,०००/– नुकसान भरपाई मिळावी अशी ग्राहकाची मागणी आहे.

## विरुध्द पक्षकार (महावितरण) यांचा तोंडी युक्तीवाद

३) श्री. पी. एन. देवकाते,उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या, सब डिव्हीजन बारामती शहर, सौ. ए. एस. मुळे, सहा. लेखापाल, म.रा.वि.वि.कं.मर्या. उपविभागीय कार्यालय, बारामती शहर. यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन तोंडी युक्तीवाद केला. ग्राहकाचे बिल मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या टॅरिफ आदेश दि. २६/०६/२०१५ व परिपत्रक क्र. २४३ दि. ०३/०७/२०१५ प्रमाणे आकारलेले आहे. सदर ग्राहकास व्यापारी वर्गवारीने वीज बिल देणे आवश्यक आहे. दि. २८/०८/२०१७ रोजी भरारी पथकाने ग्राहकाच्या युनिटला भेट दिली होती. तेंव्हा असे निर्दशनास आले की, ग्राहकास व्यापारी वर्गवारी प्रमाणे वीजबिल देणे आवश्यक आहे. त्यामुळे फरकाचे बिल एप्रिल २०१८ महिन्यात दिले आहे. व फरकाचे बिल ग्राहकाने भरले नाही. ग्राहकास फरकाचे बिल रुपये ०५,१७,५५०/– भरण्याबाबत दि. २७/०४/२०१८ रोजी कळविले आहे. ग्राहक भरारी पथकाने तपासणी केलेल्या तारखेपासून व्यापारी दराने बिल भरण्यास तयार आहे. अंर्तगत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, बारामती यांनी दि. २७/०६/२०१८ रोजी ग्राहकाचा तक्रार अर्ज फेटाळला आहे.

कंपनीने पुढे असे कथन केले आहे की, ग्राहकाने त्यांच्या युक्तीवादात दाखल केलेल्या प्रकरणाचे निकाल या प्रकरणास लागू होत नाहीत. कंपनीने प्रस्तुतची तक्रार फेटाळण्यात यावी अशी मागणी केली आहे.

## कारणमिमांसा

तक्रारदार ग्राहकाने दि. २६/४/२०१८ रोजी वितरण कंपनीस असेसमेंट वीज बिलाची आकरणी रदद करावी असे पत्र दिले आहे. त्याच प्रमाणे ॲपेलंट ट्रॅब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी दिल्ली अपील क्र १३१/२०१३ या केसमध्ये ७/०८/२०१४ रोजी दिलेल्या निकालाची प्रत दाखल केली आहे. सदर निकालाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, पुर्वलक्षी पध्दतीने फरकाच्या बिलाच्या रक्कमेची मागणी करता येत नाही. प्रस्तूतच्या प्रकरणातही महावितरण कंपनीने जुलै २०१५ ते मार्च २०१८ या काळातील जवळ जवळ ३३ महिन्याचे फरकाचे बिल रुपये ०५,७,५५०/– दिले आहे. या प्रकरणात दि. २८/०८/२०१७ रोजी भरारी पथकाने ग्राहकाच्या युनिटला भेट देऊन तपासणी केली आहे. भरारी पथकास असे दिसून आले की, ग्राहकाच्या बिलाची आकारणी आद्योगिक दराऐवजी व्यापारी दराने होणे आवश्यक आहे. त्यामुळे फरकाचे बिल दिले आहे.

ग्राहकाने मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग केस नं २४/२००१ मधील आदेश दि. ११/०२/२००३ ची प्रत दाखल केली आहे. सदर केस मध्येही पुर्वलक्षी पध्दतीने फरकाचे बिल आकारले जाऊ नये. असा निर्णय झालेला आहे. सदर केस मध्ये मा. आयोगाने खालील प्रमाणे अवलोकन केले आहे.

> *"No retrospective recovery of arrear can be allowed on the basis of any abrupt reclassification of a consumer even though the same might have been pointed out by the Auditor. Any reclassification must follow a definite process of natural justice and the recovery, if any, would be prospective only as the earlier classification was done with a distinct application of mind by the competent people. The same cannot be categorized as an escaped billing in the strict sense of the term to be recovered retrospectively. With the setting up of the MERC, order of the Commission will have to be sought as any reclassification of consumer directly affects the Revenue collection etc. as projected in its Tariff order.*

*The same could be done either at the time of the tariff revision or through a special petition by the utility or through a petition filed by the affected consumer. In all these cases, recovery, if any would be prospective from the date of order or when the matter was raised either by the utility or consumer and not retrospective".*

या प्रकरणात वितरण कंपनीने ग्राहकास जुलै २०१५ ते मार्च २०१८ या काळातील व्यापारी दराच्या फरकाची रक्कम रुपये ०५,१७,५५०/— पुर्वलक्षी पध्दतीने दिलेली आहे. आमच्या मते सदरचे पूर्वलक्षी पध्दतीने दिलेले बिल नियमानुसार नाही. व अशा प्रकारचे बिल वितरण कंपनी देऊ शकत नाही. त्यामुळे सदरचे फरकाचे बिल ग्राहकाच्या मागणी प्रमाणे रदद करण्यात येत आहे. ग्राहक पुढील बिले वाढीव दराने भरण्यास तयार आहेत. त्यामुळे भरारी पथकाने भेट देऊन तपासणी केलेल्या तारखेपासून ग्राहकाने व्यापारी दराने वीज बिल भरणे आवश्यक आहे असे या मंचाचे मत आहे. ग्राहकाने पत्र व्यवहारासाठी झालेला खर्च, मानसिक त्रास, खर्ची पडलेले श्रम वेळ प्रवास खर्च इत्यादी नुकसान भरपाई मागणी केली आहे. परंतू अशी तरतूद मंच्याच्या कक्षेत नाही. सबब आम्ही खालील प्रमाणे आदेश करीत आहोत.

## आदेश

१) तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने जुलै २०१५ ते मार्च २०१८ या काळातील पुर्वलक्षी पध्दतीने दिलेले फरकाचे बिल रुपये ५,१७,५५०/— रदद करण्यात येत आहे.

३) ग्राहकास दि.२८/०८/२०१७ पासून व्यापारी दराने वीज बिल लागू करण्यात यावे व तसे फरकाचे बिल वितरण कंपनीने ग्राहकास द्यावे व नियमाप्रमाणे वसूल करावे.

४) या आदेशाची अंमल बजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या मंचास या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करावा.

५) खर्चाबाबत हूकूम नाही.

21/12/2018

| | | |
|---|---|---|
| (श्री. बी. डी. गायकवाड) | (श्री. एस. के. जाधव ) | (श्री. एम. ए. लवटे ) |
| अध्यक्ष | ग्राहक सदस्य, | सदस्य सचिव |

टीपः— १) प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल तारखेपासून २महिन्यांच्या आत निकाली काढता आला नाही कारण ग्राहकाने वाढीव मुदतीसाठी अर्ज करुन मागणी केली आहे.

२) या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा—कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.